# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा.</u>

<u>जिल्हा न्यायालय पदभरती–२०२३</u>

## <u>शिपाई/हमाल पदाचे मुलाखतीला पात्र उमेंदवारांसाठी सुचना.</u>

जे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र झालेले आहेत, त्यांनी मुलाखतीच्या वेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती व अर्ज केलेल्या पदानुसार त्यांच्या मूळ प्रती पडताळणीच्या उद्देशाने जिल्हा न्यायालयाच्या संबंधित प्रबंधकाकडे सादर करणे आवश्यक आहे.

१. जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र.)

२. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.

४. दोन सन्माननीय व्यक्तिंनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे, त्यांचे नाव, पदनाम आणि पूर्णटपाल पत्यासह, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, या जाहिरातीबरोबर दिलेल्या विहीत नमुन्यात दिलेले.

५. पात्रतेच्या निकषात नमुद केल्याप्रमाणे विद्यापीठ/संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

६. शासनाने विहित केलेल्या प्राधिका–याकडून निर्गमित केलेला जातीचा दाखला, जिथे लागू असेल तेथे.

७. उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून "ना हरकत प्रमाणपत्र"

८. अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे, असल्यास.

९. विवाहीत महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र/सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

१०. इतर कोणतीही कागदपत्रे, जर जिल्हा न्यायालय आस्थापनेने मागितल्यास.

आदेशानुसार

08/8/24

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
भंडारा